ईव्हिएम साठवणुकीसंदर्भातील
आदेश

# राज्य निवडणूक आयोग ,महाराष्ट्र

क्र.रानिआ-२०१६/ईव्हिगो/प्र.क्र.१०/संगणकीकरण.
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक.
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १६/०८/२०१६

## -:आदेश:-

ईव्हीएम साठवणुकीसंदर्भात आदेश :-

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या भारतीय राज्य घटनेच्या तरतुदींनुसार घेतल्या जातात. निवडणुका या लोकशाही प्रणालीचा पाया असून, त्या निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. या निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर नियोजित कालावधीत निवडणुका होऊन मतदान होत असून त्यानंतर मतमोजणी करुन निकाल जाहिर केले जातात. निवडणुक ही अत्यंत संवेदशनील बाब असून मतदान यंत्राचा गैरवापर, अयोग्य साठा, अयोग्य हाताळणीबाबत वेळोवेळी तक्रारी येत असतात. या सर्व बाबी विचारात घेता मतदान यंत्राच्याबाबत कोणतीही कसूर, कुचराई व हलगर्जीपणा करणे योग्य नाही.

राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत असलेल्या ईव्हीएमची साठवणूक करणेकामी महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्हा मुख्यालयात तसेच महानगरपालिकांकडे ईव्हीएम सुपूर्द करण्यात आल्या आहेत.

सध्या राज्यात एफएलसी मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षण राबविले जात आहे. त्यावेळी असे निदर्शनास येत आहे की, भारत निवडणूक आयोगाने दि.०३ मे, २०१० रोजी ईव्हिएमचा सुरक्षित व योग्य साठा ठेवण्याबाबत आदेश पारीत केलेले आहेत. त्या आदेशाच्या अनुषंगाने पाहिले असता राज्य निवडणूक आयोगाच्या ईव्हिएमचा साठा योग्य प्रकारे ठेवला जात नाही, असे निदर्शनास येत आहे. आयोगाकडून ईव्हिएम मागताना सतर्कता ठेवली जाते, परंतु निवडणूक पार पाडल्यानंतर अत्यंत अयोग्य प्रकारे निष्काळजीपणे जतन केली जाते, ही बाब गैर आहे.

ईव्हिएमची योग्य हाताळणी व सुरक्षित साठा ठेवण्याबाबत भारत निवडणूक आयोगाचे आदेश व मे.ई.सी.आय.एल. कंपनीचे मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन; राज्य निवडणूक आयोगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

१. प्रत्येक जिल्हा मुख्यालय व महानगरपालिका येथे १५०० ईव्हिएम संच ठेवता येतील. १५०० ईव्हिएम संच ठेवता येतील इतक्या जागेकरिता योग्य गोडाऊनची व्यवस्था जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.
२. सदरच्या गोडावूनमध्ये लाकडी प्लॅटफॉर्म (भारत निवडणूक आयोग व मे.ई.सी.आय.एल. कंपनीच्या Manual नुसार) तयार करुन एकावर एक अशा जास्तीत जास्त चार ट्रंक ठेवण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत बी.यू. अथवा सी.यू. ट्रंक व्यतिरिक्त सुटे ठेवण्यात येऊ नयेत.
३. गोडावूनमध्ये सुस्थितीतील अग्नीशमन उपकरणे (Fire extinguisher) प्रत्येक पंधरा मिटरवर ठेवण्यात यावे.
४. संपूर्ण गोडावूनमध्ये आवश्यक त्या प्रमाणात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावेत.
५. सुरक्षेच्यादृष्टीने अलार्म सिस्टीमही बसविण्यात यावी.
६. गोडावूनमध्ये ठराविक कालावधीत जंतूनाशकांची फवारणी करण्यात यावी. जेणेकरुन उंदिर, घुशी व अन्य किटकांपासून ईव्हीएमच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण होणार नाही.
७. सदर गोडवूनमध्ये Exhaust Fan लावण्यात यावेत. तसेच त्यामध्ये Vacum Cleaner ची व्यवस्थाही करण्यात यावी.
८. सदरच्या गोडावून साठी चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात यावी. साठवणुकीचे ठिकाणी मर्यादीत व अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश देण्यात यावा. अशा सर्व प्रवेशांचा दिनांक, वेळ, नाव, हुद्दा, कारण अशा प्रमाणे नोंदवहीत नोंद घ्यावी.
९. सदरच्या ईव्हीएम संचांची साठवणूक व व्यवस्थापनाकरिता एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे (तहसिलदार दर्जाच्या ) पदभार देण्यात यावा. तसेच त्यास सदरच्या कामाकरिता पुरेसा सहायक कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात यावा.
१०.सदर गोडावूनला ०२ वेगळया किल्ल्या असलेले कुलुप लावण्यात यावे. (Double Lock System) त्याची पहिली किल्ली उपजिल्हाधिकारी (निवडणूक) यांच्याकडे व दुसरी किल्ली तहसिलदार दर्जाच्या अधिका-यांकडे असावी.
११.ताब्यात असलेल्या ईव्हीएम संचाच्या बॅलेट युनिट,कंट्रोल युनिट व पांढऱ्या मेमरी चिप (DMM) यांच्यासाठी सोबत दिलेल्या नमुन्यानुसार साठा रजिस्टर ठेवून यथोचित नोंदी अद्ययावत करण्यात याव्यात.
१२.ईव्हीएम संच निवडणूक कामी अन्य ठिकाणी रवाना करताना साठा रजिस्टरमध्ये नोंदी अद्ययावत करुन अन्य ठिकाणच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात याव्यात. ईव्हिएम संच स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याची नोंदवहीत स्वाक्षरी घ्यावी.

१३.निवडणुकीकरिता अन्य ठिकाणाहून आणलेल्या ईव्हीएम निवडणूक पश्चात आतील पांढऱ्या मेमरी (DMM) सिल करुन शासकीय कोषागारात ३ महिन्यांपर्यंत जमा करण्यात याव्यात व उर्वरित पांढऱ्या मेमरी, सी.यू. व बी.यू. पुन्हा मुख्य गोडावूनमध्ये त्वरीत जमा करण्यात यावेत.

१४.कंट्रोल युनिट गोडवूनमध्ये ठेवताना त्यातील वापरलेल्या पॉवर पॅक काढून वेगळया ठेवाव्यात. गोडावूनमध्ये ईव्हीएम व्यतिरिक्त इतर कोणतेही साहित्य ठेवण्यात येऊ नये.

१५.शासकीय कोषागारात निवडणूकपश्चात जमा करण्यात आलेल्या पांढऱ्या मेमरी ३ महिन्यांचा कालावधी पूर्ण होताच पुनश्च ताब्यात घेऊन (न्यायप्रविष्ठ प्रकरणे वगळता) मुख्य गोडावूनमध्ये जमा करण्यात याव्यात.

१६.जिल्हयात तसेच महानगरपालिका/नगरपरिषदेस देण्यात आलेले ईव्हीएम संच अन्य तालुक्यात प्रभाग कार्यालयात साठवणुकीकरिता विभागून न देता एकाच गोडाऊमध्ये साठवण्यात यावेत.

१७. सोबत जोडलेल्या नमुन्यांमधील बिनचूक व अद्ययावत माहिती आयोगास विनाविलंब सादर करावी.

१८. कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाशिवाय गोडावूनमधून ईव्हीएम (सी.यू., बी.यू. व पांढऱ्या मेमरी) बाहेर काढू नयेत वा इतर कोणाकडून प्राप्त झालेल्या ईव्हीएम त्यामध्ये ठेवू नयेत.

१९. सदर गोडवूनमध्ये पावसाचे पाणी जाणार नाही,याद्दष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये सदर गोडावूनचे नुकसान होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

२०. आयोगाचे अधिकारी, कर्मचारी व प्रतिनिधी जेव्हा जिल्हयाच्या भेटीस किंवा मतदान यंत्राच्या तपासणीस येतील, त्यावेळी वरील प्माणे कार्याची नोंद नोंदवहीत असणे आवश्यक आहे. तसे न आढळल्यास संबंधितांवर कार्यवाही केली जाईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

( अविनाश सणस )
प्रभारी उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

कृ.मा.प..४/-

सोबत:-

१. ईव्हीएम ठेवण्यात आलेल्या गोडावूनमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींच्या नोंदवहीचा नमुना.

२. गोडावूनमधील ईव्हीएमचा तपशिल ठेवण्याच्या नोंदवहीचा नमुना

३. गोडावूनच्या ले-आऊटचा नमुना.

४. ईव्हीएम ठेवण्याकरिता वापरायच्या लाकडी रॅकचा नमुना.

प्रत:-माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीकरिता रवाना.

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
४. सर्व उप जिल्हाधिकारी (निवडणूक) /सर्व उप आयुक्त(निवडणूक), महानगरपालिका.
५. सर्व तहसिलदार
६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
७. मा.आयुक्त याचे स्वीय सहायक
८. मा.सचिव यांचे स्वीय सहायक
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोडावूनमध्ये येणाऱ्या व्यक्तींच्या नोंदवहीचा नमुना

| दिनांक | उघडण्याची वेळ | गोडावून उघडणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पदनाम | गोडावून उघडण्याचे कारण | सही | बंद करण्याची वेळ | सही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोडावूनमधील सी.यू.,बी.यू. व पांढऱ्या मेमरींचा तपशील ठेवण्याच्या नोंदवहीचा नमुना

| दिनांक | वेळ | गोडावूनमध्ये ईव्हीएमचा तपशिल | शिल्लक कंट्रोल युनिटची संख्या | शिल्लक बॅलेट युनिटची संख्या | शिल्लक पांढऱ्या मेमरींची संख्या | गोडावूनचे काम हाताळणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | सही | शेरा (ईव्हीएम वाटपासंदर्भातील राज्य निवडणूक आयोगाच्या पत्राचा क्रमांक व दिनांक नोंदवावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शिल्लक असलेले ईव्हीएम | | | | | | |
| | | प्राप्त झालेले ईव्हीएम | | | | ईव्हीएम स्वीकारणाऱ्या अधि./कर्मचाऱ्याचे नाव | सही | |
| | | वाटप केलेले ईव्हीएम | | | | ईव्हीएम स्वीकारणाऱ्या अधि./कर्मचाऱ्याचे नाव | सही | |
| | | गोडावूनमधील शिल्लक ईव्हीएम | एकूण कंट्रोल युनिटची संख्या | एकूण बॅलेट युनिटची संख्या | एकूण पांढऱ्या मेमरींची संख्या | ईव्हीएम स्वीकारणाऱ्या अधि./कर्मचाऱ्याचे नाव | सही | |





FIG. 22 LAY-OUT OF STORE





Fig. 23 Wooden Platorm